## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला

द्वारा संचालित

## श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला

## श्रमसंस्कार विशेष शिबीर अहवाल

## ग्राम आपोती खुर्द

## सत्र (२०२०-२१)

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

**अंतर्गत**

**दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित**

# श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला

**श्रमसंस्कार विशेष शिबीर अहवाल ग्राम आपोती खुर्द**

## १९ ते २६ मार्च २०२१-२२


| अ. क्र.<br>Sr.No. | घटक<br>(Particular) | पान क्रमांक<br>Page No. |
|---|---|---|
| १ | विशेष शिबीर लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र | |
| २ | Receipts & Payments Account | |
| ३ | पावत्या व देयक खाते<br>Special Camp Utilization Certificate | |
| ४ | शिबिरार्थी यादी | |
| ५ | शिबिरार्थी हजेरी (Attendance Sheet) | |
| ६ | विशेष शिबीर पत्रिका | |
| ७ | शिबीर अहवाल | |
| ८ | समन्वयक , जिल्हा समन्वयक , क्षेत्रीय समन्वयक अभिप्राय | |
| ९ | विशेष शिबीर कार्यक्रम आर्थिक मुल्याकन आणि विशेष शिबीर कार्यक्रमांतर्गत राबविलेले अभिनव प्रकल्प (W-2593 to W-2596) | |
| १० | वृत्तपत्र कात्रणे | |
| ११ | छायाचित्रे | |

The Berar General Education Society's

## Shri RLT College of Science, Akola

NATIONAL SERVICE SCHEME

in Collaboration with

Crystal Club, Department of Chemistry and Women Cell

Organises

*One Day Skill Development Workshop on*

## *"HERBAL PRODUCTS"*

*Perfumes, Air Fresheners, Mosquito Repellent, Floral Disinfectant, Skin Glowing Cream and Pain Relief Oil etc.*

*Venue*

Mahila Melawa at N.S.S. Special Camp 2021-22 at Apoti khurd
at 3:00 PM

*Resource Person*

Dr. Poonam T. Agrawal
Associate Professor & Head, Department of Chemistry
SHRI RLT COLLEGE OF SCIENCE, Akola.

Dr. Rashmi Joshi Sawalkar
NSS Program Officer
Miss. Sonali Gawande
NSS Co- Program officer

Dr. Sujata Tadam, Chairmen, Women Cell
Dr. Kavita Heda Member, Women Cell
Dr. Anjali Sangole, Member, Women Cell
Smt. Jyoti Geete , Member, Women Cell
Mr. Kishor Y. Patil , Member, Women Cell

Dr. Ashish Sarap
Crystal Club Member
Smt. Vaishali Badgujar
Assistant Prof. & Head Dept. of Botany
Dr. Archana S. Sawarkar
Assistant Prof. & Head Dept. of Zoology

## राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती बैठक

## (दि. १५.०३.२०२२)

भारत सरकार युवा कार्य व खेळ मंत्रालय दिल्ली रा.से.यो.संहिता २००६ भाग-४ प्रकरण -५ मुद्दा क्रमांक ४, ४, १, ४, २, ४, ३ अन्वये रा.से.यो. विध्यापीठ कक्षाद्वारे निश्चित झालेले धोरणात्मक निर्णय कृती कार्यक्रम आराखडा आखणे तसेच नियोजन संबंधित सत्र २०१८-१९ करिता राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीचे गठन दि. २७ जून २०१८ (बुधवार) रोजी महाविद्यालयात रा.से.यो. अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय डी. नानोटी यांच्या मार्गदर्शनात करण्यात

आले. या बैठकीत खालील सल्लागार समिती सदस्य उपस्थित होते व खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

सल्लागारसमितीचेसदस्यखालीलप्रमाणेनिवडण्यातआले :

| | | |
|---|---|---|
| डॉ. विजय डी. नानोटी | प्राचार्य | अध्यक्ष |
| प्रा.डॉ.सुधीर कोह्चाळे | क्षेत्रीय समन्वयक रा. से. यो. | सचिव |
| प्रा.डॉ.समाधान मुंडे | कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| प्रा.डॉ.रश्मी जोशी (सावलकर) | कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| प्रा. सोनाली गेवांदे | सह-कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| प्रा. शैलेश जयस्वाल | सह-कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| श्रीशांतनू वावगे | पुरुष गट प्रमुख | सदस्य |
| कु. रुतुजा दांदले | महिला गट प्रमुख | सदस्य |
| मा. सौ. रेखा वि. घोडे | उप-सरपंच, ग्राम अपोती. खुर्द | सदस्य |
| श्री.अखिलेश पुराणिक | प्रतिनिधी | सदस्य |
| कु.ह्तुजा गोपनारायण | प्रतिनिधी | सदस्य |

वरील बैठकीत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

- ❖ सत्र २०१९-२० करिता महाविद्यालयाकडून रुपये ५०,०००/- अग्रीम मागणी.
- ❖ रा.से.यो. च्या नेतृत्वात ५ गावांचे, उन्नत भारत अभियान अंतर्गत - पारिवारिक सर्वेक्षण करण्याबाबत.
- ❖ कार्यक्रम अधिकारी म्हणुन प्रा. डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे व सह कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. शैलेश जैस्वाल व प्रा. सोनाली गवांदे यांची नियुक्ती.
- ❖ महाविद्यालयीन रा.से.यो. पथकात श्री.अखिलेश पुराणिक व कु.ह्तुजा गोपनारायण यांची गटप्रमुख पदीनियुक्ती.

- ❖ यावर्षी दत्तक ग्राम आपोती खुर्द येथे श्रमदानातून सांडपाणी व्यवस्थापन करणे बाबत.
- ❖ सल्लागार समितीत घेण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये  श्री शांतनू वावगे व कु. रुतुजा दांदले यांची गटप्रमुख यापदीसर्वानुमते निवड करण्यात आली.
- ❖ नवीन फ्लेक्स तयार करणेबाबत.
- ❖ स्वच्छ भारत स्वस्थ भारत प्रभावीपणे राबविण्याबाबत.
- ❖ वेगवेगळे नवीन उपक्रम  ‘मोतीबिंदू मुक्त गाव, रक्तगट तपासणी शिबीर, सोयाबीन प्रशिक्षण कार्यशाळा,आजीचा बटवा एक स्पर्धा’ अशे विविध उपक्रम राबविण्याबाबत.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठअंतर्गत**

**राष्ट्रीय सेवा योजना**

**श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय अकोला**

**विशेष शिबीर - ग्राम आपोती (खुर्द)**

## अहवाल

**शनिवार : दिनांक : १९/०३/२०२२**

**आगमन, पूर्वतयारी, स्वच्छताव नोंदणी**

ग्राम आपोती (खु.) येथे दिनांक **१९/०३/२०२२** रोजी विद्यार्थ्यांचे आगमन झाले, यानंतर विद्यार्थ्यांची नोंदणी व पूर्व तयारी करण्यात आली. सर्वप्रथम कार्यक्रम परिसर कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर विद्यालय येथे स्वच्छता करण्यात आली. तसेच गावकऱ्यांसोबत चर्चा व प्रकल्पांची पाहणी करण्यात आली. कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी ह्यांनी ग्राम पंचायतमध्ये सरपंच उपसरपंच, महिला प्रतिनिधी व पोलिस पाटील ह्यांना बोलावून सभा घेण्यात आली. तसेच बचत गटाच्या महिलांच्या सुद्धा २ सभा घेण्यात आल्या, ज्यामध्ये त्यांना शिबिरातील कार्यक्रमाबद्दल माहिती पुरविण्यात आली व सहभागी होण्याचे आव्हान करण्यात आले. "उन्नत भारत अभियान, स्वच्छ भारत स्वस्थ भारत"अभियान अंतर्गत ग्रामआपोती (खु.) येथे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची व कार्यक्रमाची माहिती कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे यांनी गावकऱ्यांना दिली.

**रविवार**

**दिनांक : २०/०३/२०२२**

**उद्घाटन समारोह:**

ग्रामआपोती (खु.) येथेश्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन ०७ डिसेंबर २०१९ रोजी पारपडले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून मा. डॉ. व्ही. डी. नानोटी, प्राचार्य श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला हे उपस्थित होते व उद्घाटक म्हणून क. शि. प्र. संस्था आपातापाचे अध्यक्ष श्री दामोदर कडू उपस्थित होते. कार्यक्रमाची शोभा वाढविण्यास इतर मान्यवर सुद्धा उपस्थित होते. सौ. रेखा वी. घोडे (उप-सरपंच), डॉ. उमेश वि. बोपटे (माजी उपसरपंच), श्री. कैलासराव वि. अपोतीकर (पोलीस पाटील), सौ वृंदा शांतारामजी बुटे (संस्थापकक. शि. प्र. संस्था आपातापा) त्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. मा. प्रा. सौ सुचिता बुजुर्गे, प्राचार्य, बी. एड. महाविद्यालय आपोती, ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात वैराग्य मूर्ती संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजयांच्या प्रतिमेला हारार्पण व पूजन व विद्यापीठ गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रश्मी जोशी कार्यक्रम अधिकारी ह्यांनी केले, तर संचालन डॉ. समाधान मुंडे ह्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांनी अध्यक्षीय भाषणात शिबिरार्थ्यांचे मार्गदर्शन केले व covid 19 पासून बचाव करण्याचे आव्हान केले व शिबिराच्या यशस्विते करिता शुभेच्छा दिल्या.

**रविवार**

**दिनांक : २०/०३/२०२२**

**सांस्कृतिक कार्यक्रम:**

सायंकाळच्या सत्रात प्रार्थना, स्फूर्ती गीत न सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. शिबिरार्थ्यांना सर्व ६ दिवसाची माहिती देण्यात आली व विविध गट बनवून कार्याचे वाटप करण्यात आले.

**सोमवार : दिनांक : २१/०३/२०२२**

**कार्यक्रम : "Covid-19 लसीकरण शिबीर"**

**सादरकर्ते:** **Dr. Asmita Pathak**(Nodal Officer Covid, City T.B. Officer, Akola Municipal Corporation)and
**Dr. Manish Sharma** (District R.C.H. Officer Z.P. Akola.)

दत्तकगाव येथे गावकर्यांसाठी COVID-19 लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्या करिता डॉ. अस्मिता पाठक (Nodal Officer Covid, City T.B. Officer,Akola Municipal Corporation)आणि डॉ. मनीष शर्मा(District R.C.H. Officer Z.P. Akola.)ह्याच्या संयुक्त विद्यमाने लसीकरण बद्दल जनजागृती कार्य करिता व्याक्यानाचे आयोजन करण्यात आले.१२ ते १८ वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांचे लसीकरणाचे उद्घाटन रासेयो शिबिरातूनच केल्या गेले. ७५ गावकरयांचे (१८ वर्षावरील) लसीकरण केले गेले. १५० मुलांचे (१२ ते १८ वयोगटातील) लसीकरण मोहीम सलग दोन दिवस राबविण्यात आली. जिल्हा परिषद आरोग्य विभागाची Video van च्या माध्यमातून महिलांमधील इतर आरोग्य संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली गेली. महिला व बाल संगोपन, हिमोग्लोबिन वाढविणे न मासिक पाळीच्या संबंधित आजारांबद्दल माहिती देण्यात आली.

**सोमवार : दिनांक : २१/०३/२०२२**

**कार्यक्रम : "रक्तगटतपासणी शिबीर"व "पर्यावरण संवर्धनात सूक्ष्मजीवांचा वाटा"**

शिबिराच्याचवथ्या दिवशीच्या दुपारच्या सत्रात डॉ. हरीश मालपाणी, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख, श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला, ह्यांनी "पर्यावरण संवर्धनात सूक्ष्मजीवांचा वाटा"ह्या विषयावर विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. सूक्ष्मजीवांबद्दल ची खूप सुंदर माहिती प्रस्तुत केली. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाकडून गावातील शालेय विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. रासेयो शिबिराच्या एका दिवसाला असे विविध आरोग्य शिबीर राबविण्यात येत असते. ९ वी आणि १० वी च्या १०० शालेय विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासून देण्यात आले. हे शिबीर सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख, डॉ. मालपाणी व प्राध्यापिका सोनाली गवांदेह्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालाच्या मुख्याध्यापकांनी त्याकरिता मा. डॉ. भालेकर आणि डॉ. जोशीह्यांचे आभार मानले.

**मंगळवार : दिनांक : २२/०३/२०२२**

**कार्यक्रम : "आपत्तीव्यवस्थापन"**

**सादरकर्ते : श्री. शैलेंद्र मढावी व श्री शंकेश झायटे** (श्री रा.ल.तो विज्ञान महाविद्यालय अकोला)

शिबिराच्या चवथ्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात श्री. शैलेंद्र मढावी व श्री शंकेश झायटे (श्री रा.ल.तो विज्ञान महाविद्यालय अकोला) ह्यांनी आपत्ती च्या काळात कशा प्रकारे सावधगिरी बाळगावी व काय करावे ह्या बद्दल खूप सुंदर अशी कार्यशाळा घेतली. कार्याशाळे दरम्यान विविद उपयोगी बाबींची माहिती व प्रशिक्षण देण्यात आले. गावामध्ये नदीला पूर आलेला असतांना, आग लागली असतांना, अपघात झालेला असतांना प्रथमोपचार व काय उपाय योजना करावी ह्याचे गावकर्यांना प्रशिक्षण दिले.

**मंगळवार : दिनांक : २२/०३/२०२२**

**कार्यक्रम : "कायदेविषयक मार्गदर्शन"**

**सादरकर्ते : मा. Adv. मोतीसिंगजी मोहता** (अध्यक्ष, दि. बेरार जनरल एज्यु. सोसायटी, तसेच सदस्य महाराष्ट्र गोवाबार असोसिएशन व जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, अकोला)

दिबी. जी. ई. सोसायटीद्वारा संचालित, श्री. रालतो विज्ञान महाविद्यालया अंतर्गत रासेयो शिबिरा मध्ये आपोती खुर्द या गावात दि. २२/०३/२२ रोजी कायदेविषयक मार्गदर्शन हा कार्यक्रम संपन्न झाला. दुपारच्या सत्रात" कायदेविषय ..र्शन " ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. अ‍ॅड. मोतीसिंहजी मोहतातर मार्गदर्शक म्हणून न्यायाधीश मा. अमित कोकरे, प्राचार्य मा. डॉ. विजय नानोटी, माजी उपसरपंच मा. उमेश बोपटे, पोलीस पाटील मा. कैलासराव अपोतीकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला अध्यक्ष स्थानी लाभलेले मा. अ‍ॅड. मोतीसिंहजी मोहतासाहेब व प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले विध्यमान श्री स्वरुपजी बोस, विध्यमान श्री लाडवले साहेब आणि अ‍ॅड गजाननजी खाडेयांनी कायदेविषयक मार्गदर्शन उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शैलेश जयस्वाल यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. समाधान मुंडे यांनी केले. त्याचबरोबर श्री. रालतो विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ व्ही. डी. नानोटी, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, श्री दामोदरजी कडू गुरुजी, डॉ. उमेश बोपटे, श्री प्रमोद बोपटे, आदि प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेश जयस्वाल तर आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे यांनी केले.

**मंगळवार : दिनांक : २२/०३/२०२२**

**कार्यक्रम : पार्थना, स्फूर्ती गीत व सांस्कृतिक कार्यक्रम**

सायंकाळच्या सत्रात शिबिरार्थ्याचे प्रार्थना व स्फूर्ती गीतांच्या माध्यमातून संस्कार घडवून त्यांच्यात मनोबल वाढविण्याचे काम केले. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध सांकृतिक

कार्याक्रमचे आयोजन केले. त्यांचामध्ये आत्मविश्वास वाढविण्या करिता व त्यांचे व्यक्तिमत्व विकास करण्याकरिता प्रयत्न केले.

**बुधवार : दिनांक : २३/०३/२०२२**

**कार्यक्रम : "आयुष्याचीटाळेबंदी"**

**सादरकर्ते : डॉ. सुधीर कोल्हचाले** (क्षेत्री. सम. रासेयो, श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला)

शिबिराच्या पाचव्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात डॉ. सुधीर कोल्हचाले (क्षे.सम. रासेयो, श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला) श्री.रा.ल.तो. विज्ञानमहाविद्यालयाद्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे आठ दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक व रासेयो चे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोहचाळे यांनी आपल्या प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत प्रात्यक्षिके दाखवत आपत्तीला न डगमगता कशा प्रकारे सामोरे जाता येऊ शकते याबद्दल मार्गदर्शन केले. प्रथमतः डॉ.कोहचाळे यांनी आपत्तीची खरी ओळख करून दिली आपत्तीचे प्रकार काय आणि कसे असतात हे स्पष्ट करून त्या वर प्रकाश टाकला. या नंतर प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत दोराच्या साह्याने आपण आपत्तीच्या काळात कशा प्रकारे वापर करून विविधगाठांचा उपयोग होतो, त्यावर त्यांनी मार्गदर्शन केले. अपघात झाला असेल तर पीडित व्यक्तीला कशा प्रकारे प्रथमोपचार द्यावायाचे प्रात्यक्षिक दिले. त्यानंतर पुनर्जिवितीकरण कशा प्रकारे करण्यात येते हे प्रात्यक्षिकांच्या स्वरुवात त्यांनी रासेयोच्या शिबिरार्थींना दाखविले. तसेच प्रशिक्षित स्वयंसेवक श्री. अंकित गोसावी यांनी सर्पदंश झाल्यास कशा प्रकारे सामोरे जावे याबाबतीत मार्गदर्शन केले. सर्व आप्पत्या सांगून येत नाहीत आणि आपण जर आपत्यांनाच समजून घेतले आणि त्याची माहिती पूर्ण स्वरूपात ठेवली तर सर्वसमाज जीवित आणि वित्त हानी पासून वाचू शकतो.

**बुधवार : दिनांक : २३/०३/२०२२**

**कार्यक्रम : "व्यक्तीमत्वविकास"**

**सादरकर्ते : डॉ. महेश डाबरे** (श्री ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालय, )

श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालया द्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या पाचव्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात "टीम बिल्डिंग" या विषयावर मार्गदर्शनासाठी श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालया चे प्रा. डॉ. महेश डाबरे हे आले होते. आजच्या स्पर्धेच्या युगात आणि स्पर्धेच्या जगात कशा प्रकारे मानसिक दडपण येते. तसेच आजच्या स्थितीत विशेष करून तरुण पिढीने कशा प्रकारे टीम वर्कच्या सहाय्याने व बुद्धिमत्तेने, एकतेने कोणत्याही कठीण परीस्थीतीला सामोरे जाऊन जिंकता येते ,याची उदाहरणे देऊन टीम बिल्डिंग चे महत्त्व पटवून दिले. मनाने आनंदी व विचाराने समृद्ध आयुष्य कशा प्रकारे जगता येईल या विषयी सुद्धा डॉ. महेश डाबरे

यांनी उद्बोधन केले. कार्यक्रमाचे संचलन शांतनू वावगे व आभार प्रदर्शन वैष्णवी दातीर ह्या विद्यारथ्यांनी केले.

**बुधवार : दिनांक : २३/०३/२०२२**

**कार्यक्रम : "जादूटोणाप्रतिबंधक कायदा"**

**सादरकर्ते : डॉ. स्वप्ना लांडे** (सामाजिक कार्यकर्ता)

शिबिराच्या पाचव्या दिवसाच्या सायंकाळच्या सत्रात आपातापा येथील हनुमान मंदिरात गावातील लोकांचे **"जादूटोणा प्रतिबंधक कायदा"** विषयी प्रबोधन व जनजागृती करण्याकरिता सामाजिक कार्यकर्ता डॉ.स्वप्ना लांडे ह्यांच्या व्याख्यानाचे आयोजन केल्या गेले. व्याख्यानाला गावकर्यांचा उत्स्फूर्त प्रातिसाद मिळाला. विविध प्रात्याक्षिके व ढोंगी बाबांचे जादूचे खोटे प्रयोग दाखवून लोकांचे उद्बोधन केले.

**गुरुवार : दिनांक : २४/०३/२०२२**

**कार्यक्रम : "उन्नतभारत अभियान - पारिवारिक सर्वेक्षण"**

शिबिराच्यासहाव्या दिवशीच्या सकाळच्या सत्रात योगा, प्रभात फेरी व पाठ्नात्याच्या सहहायाने जनजागृती करण्यात आली. उन्नत भारत अभियान (UBA) अंतर्गत परीवारिक सर्वेक्षणाचे कार्य केल्या गेले. UBA अंतर्गत श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाने ५ गावं दत्तक घेतली आहे, आखातवाडा, सुलतानपूर, आपातापा, आपोती खुर्द आणि आपोती बुजुर्ग. ह्या पाच हि गावांचे व परिवारांचे सर्वेक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.

**गुरुवार : दिनांक : २४/०३/२०२२**

**कार्यक्रम : "भारतीयांनाभारताच्या जैवविविधतेचा परिचय"**

**सादरकर्ते : मा. श्री. उदय वझे** (EFEC NGO, सृष्टी वैभव चे संचालक, अकोला.)

शिबिराच्यासहाव्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात श्री उदय वझे (EFEC NGO व सृष्टी वैभव चे संचालक, अकोला.) ह्यांनी गावातील शालेय विद्यार्थ्यांचे व शिबिरार्थ्यांचे आपल्या भागातील जैवविविधतेबद्दल खूप चं माहिती देऊन मार्गदर्शन केले. अकोला भागातील विविध पक्ष्यांची माहिती दिली व त्यांच्या कडून होणारे पर्यावरणाचे सांभाळ ह्याबद्दल विशेष मार्गदर्शन केले. पक्ष्यांमुळे पर्यावरणाचे संवर्धन कश्या प्रकारे केले जाते हे त्यांनी पटवून दिले.

**गुरुवार : दिनांक : २४/०३/२०२२**

**कार्यक्रम : "महिलाव बालविकास"**

**सादरकर्ते : मा. भारती लांडे** (बालविकास व प्रकल्प अधिकारी, बाळापुर, जि. अकोला)

शिबिराच्यासहाव्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात मा. भारती लांडे ज्या बाळापुरला बालविकास व प्रकल्प अधिकारी आहेत, त्यांचे व्याख्यान व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यांनी गावातील महिलांना भारत सरकारच्या विविध ज्या महिला व बाल्कल्याण विषयीच्या योजना आहेत त्याबद्दल

मार्गदर्शन केले. गावातील महलांचे उद्बोधन करून ह्या योजनांचा पुरेपूर उपयोग करण्याचे आह्वान केले.

**गुरुवार : दिनांक : २४/०३/२०२२**

**कार्यक्रम : "अवकाशदर्शन"**

**सादरकर्ते : श्री शैलेश जयस्वाल** (श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला)

शिबिराच्या सहाव्या दिवसाच्या सायंकाळच्या सत्रात "अवकाश दर्शन" या विषयावर उद्बोधन करण्याकरिता श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालया चे प्रा.शैलेश जयस्वाल (भौतिक शास्त्र विभाग) हे आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आपले विश्व, ब्रह्मंड, आकाश गंगाया विषयी माहिती दिली. तसेच ग्रह-तारे व नक्षत्रां विषयी माहिती सुद्धा त्यांनी शिबिरार्थींना दिली. कार्यक्रमाचे संचलन कु. ऋतुजा दांदळे तर आभार प्रदर्शन कु. वाश्नावी महल्ले या विद्यार्थ्यांनी केले. तेलेस्कॉपे च्या माध्यमातून अवकास दर्शन घडवून आणले.

**शुक्रवार : दिनांक : २५/०३/२०२२**

**कार्यक्रम : "उन्नतभारत अभियान- पारिवारिक सर्वेक्षण"**

शिबिराच्या सहाव्या दिवशीच्या सकाळच्या सत्रात योगा, प्रभात फेरी व पाठ्नात्याच्या सहहायाने जनजागृती करण्यात आली. उन्नत भारत अभियान (UBA) अंतर्गत परीवारिक सर्वेक्षणाचे कार्य केल्या गेले. UBA अंतर्गत श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाने ५ गावं दत्तक घेतली आहे, आखातवाडा, सुलतानपूर, आपातापा, आपोती खुर्द आणि आपोती बुजुर्ग. ह्या पाच हि गावांचे व परिवारांचे सर्वेक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.

**शुक्रवार : दिनांक : २५/०३/२०२२**

**कार्यक्रम : "तणाव मुक्त जीवनशैली"**

**सादरकर्ते : मा. श्री. जीवनजी देशमुख** (सामाजिक कार्यकर्ते)

श्रमसंस्कार शिबिराच्या सहाव्या दिवशी दुपारच्या सत्रात सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. जीवनजी देशमुख ह्यांनी "तणाव मुक्त जीवनशैली"ह्या विषयावर विद्यर्थ्यांचे व गावकर्यांचे अतिशय साध्या आणि सोप्या पद्धतीत उद्बोधन केले. धकाधकीच्या ह्या जीवनात घर आणि कार्यालय सांभाळनाऱ्या महिला वर्ग व पुरुष ह्यांन तणावा पासून कसे दूर राहावे आणि जर तणाव असले तरी साध्या छोट्या उपाय जसे कि ध्यान करणे, मातीच्या भिंतीला डोक टेकवून ध्यान केल्याने कसे ताण कमी करू शकतो हे सर्वांना पटवून दिले.

**शुक्रवार : दिनांक : २५/०३/२०२२**

**कार्यक्रम:** **"महिलामेळावा"**कौशल्य विकास एक दिवसीय कार्यशाळा (Herbal Products)

**सादरकर्ते:** **मा. डॉ. पूनम टी. अग्रवाल** (Asso. Prof. श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला)

दुपारच्या सत्रात गावातील महिलांसाठी "महिला मेळाव्याचे" आयोजन करण्यात आले होते. ह्या मेळाव्यात गावातील महिलांकरिता एक दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ रश्मी जोशी (सावलकर) यांनी गावातील महिलांना करून दिला. या कार्यशाळे मध्ये **हर्बल उत्पादने (Perfumes, Mosquito repellents, Air freshner, Pain relief oil, Floral disinfections, Skin glowing cream etc.)**बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. गावातील महिलांमध्ये उद्योजकता निर्माण करण्याकरिता ह्या कार्यशाळेचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी व प्रा. सोनाली गवांदे ह्यांनी व श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या वूमनसेल ह्यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. resource person म्हणून मा. डॉ. पूनम अगरवाल (रसायन शास्त्र विभाग प्रमुख, Crystal club) ह्यांनी अतिशय सोप्या पद्धतीने महिलांना प्रशिक्षण दिले. गावातील महिलांना हे हर्बल उत्पादन बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले जेणे करून कि त्या महिलांना घरगुती उद्योग सुरु करता यावे. जास्त भांडवल ना लावता कमि खार्चात गृह उद्योग सुरु करता यावे म्हणून गावातील महिलावर्ग व मुलींना ह्याचे प्रशिक्षण दिल्या गेले. या महिला मेळाव्याचे अध्यक्ष प्रा. सुजाता ताडम मॅडम तर उदघाटक म्हणून गावातील उप-सरपंच सौ रेखा घोडे ह्या होत्या.  त्याच प्रमाणे गावातील महिला तसेच श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ अर्चना सावरकर, श्रीमती वैशाली बडगुजर , डॉ कविता हेडा, डॉ अंजली सांगोले आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व मुली उपस्थित होत्या. कार्यशाळेच्या विविध सत्राचे संचलन रासेयो सह-कार्यक्रम अधिकारी प्रा सोनाली गवांदे यांनी तर आभार प्रदर्शन रासेयो ची गट-प्रमुख ऋतुजा दांदळे हिने केले.
महाविद्यालयाच्या website ची लिंक:

https://www.rltsc.edu.in/2022/04/04/one-day-workshop-on-making-herbal-products/

**शुक्रवार : दिनांक : २५/०३/२०२२**
**कार्यक्रम : “सांस्कृतिक कार्यक्रम”**

शिबिरार्थ्यांच्या मनोरंजनाकरिता व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याकरिता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

**शुक्रवार : दिनांक : २५/०३/२०२२**
**कार्यक्रम : “शिबीर समारोप कार्यक्रम”**

शुक्रवार दि. २५/०३/२०२२ रोजी शिबिराचे समारोप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मान. श्री अभिजीतजी परांजपे, सह-सचिव दि बी.जी.ई. सोसायटी, अकोला ह्यांनी भूषविले तसेच मान. श्री दामोदर कडू, अध्यक्ष, क.शि.प्र. संस्था, आपातापा ह्यांची विशेष उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य मान. डॉ. वी डी. नानोटी, सौ. रेखाताई घोडे (उप-सरपंच आपतापा), श्री कैलासराव आपोतीकर(पोलिस-पाटील आपातापा) ह्यांची उपस्थिती लाभली.

२६ मार्च २०२२ रोजी दुपारच्या सत्रात रासेयोच्या विशेष शिबिराचा समारोप कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी मा. डॉ. व्ही. डी. नानोटी (प्राचार्य श्री.रा.ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला) हे लाभले होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. समाधान एल. मुंडे व प्रा.डॉ.रश्मी पी. सावलकर तसेच सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. सोनाली एन. गवांदे हे देखील उपस्थित होते. विशेष शिबिर ग्राम आपोती (खु.) या आठ दिवसीय शिबिराचा विस्तृत अहवाल कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी यांनी प्रस्तुत केला. समारोपीय कार्यक्रम हा विशेषतः विद्यार्थ्यांचे मनोगत आणि सत्काराचा असतो म्हणून या ठिकाणी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कु. ऋतिका खंडारे तसेच गट प्रमुख कु. ऋतुजा दांडळे व गट प्रमुख श्री.शांतनू वावगे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. कार्य.सदस्य दि.बी.जी.ई. सोसायटी, अकोला यांनी जीवन घडविण्यात रासेयो चे विशेष योगदान आहे असे सांगितले. मा. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांनी विद्यार्थ्यांनी राबवलेल्या श्रमदानातून बनवलेल्या ४ शोष खड्डे तयार केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. तसेच आठ दिवसीय शिबिरामुळे विद्यार्थी घडतो, सहजीवन,सहभोजन,लोकसेवेची जाणीव या सर्व गोष्टी शिकतो, असे सांगितले. गट प्रमुख ह्यांचा सत्कार मा. डॉ. व्ही. डी. नानोटी व श्री. अभिजीत परांजपे यांनी शाल, श्रीफळ व रोपटे देऊन केले, या कार्यक्रमाचे संचलन डॉ.समाधान मुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.शांतनू वावगे यानी केले.

**छायाचित्रे**




शिबिराच्या पूर्व तयारी दरम्यान डॉ. रश्मी जोशी ह्यांनी बचत गटाच्या महिलांची सभा घेण्यात आली.




बचत गटातील महिलांसोबत गावच्या महिला सरपंच, उपसरपंच व महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या.




श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन करतांना सौ करुणा ताई शांताराम बुटे व इतर मान्यवर




दीप प्रज्वलन व गाडगे माहाराजांच्या प्रतिमेचे पूजन करतांना प्रमुख पाहुणे







मान्यवरांचे शाल, श्रीफळ व रोपटे देऊन स्वागत करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी







सायंकाळी स्फूर्ती गेत , प्रार्थना करतांना कार्यक्रम अधिकारी व माननीय प्राचार्य.







**Covid-19** लसीकरण शिबिरामध्ये मा.डॉ. मनीष शर्मा **R.C. H. Officer** जिल्हा परिषद अकोला, मा. डॉ. अस्मिता पाठक, **Nodal Officer Covid, City T.B. Officer, Akola Municipal Corporation**







**१२ ते १८ वायोगातायील शालेय मुलांचे तसेच १८ च्या वर वयोगटातील लसीकरण रासेयो शिबिराच्या माध्यमातून केले गेले**







डॉ. मनीष शर्मा आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी दर रश्मी जोशी ह्यांनी व्हिडिओ (LED) व्हान च्या सहहायाने गावातील महिलांना ब बालकाच्या सुदृढ आरोग्यासाठी विविध विडीयोक्लिप्स च्या माध्यमातून जनजागृती केली







डॉ. हरीश मालपाणी , सूक्ष्म जीवशास्त्र विभाग प्रमुख ह्यांचे व्याख्यान व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन







रासेयो चे माननीय संचालक डॉ.राजेश जी बुरंगे, संत गाडगे बाबा अमरावती उनिवेर्सित्य, अमरावती ह्यांच्या वाढदिवशी त्यांनी शिबिराला स्दीच भेट दिली. त्यांच्या सोबत मा. श्री. अरुण शेवाणे, प्रहर संघटना, उपतालुका प्रमुख ह्यांनी पक्ष्यांसाठी घरटे वितरीत केले.







गावातील शालेय परिसरात घाटे बांधून घरट्यामध्ये दाणे व पाणी टाकतांना मा.संचालक व रासेयो ची चमू.




श्रमदान व शालेय परिसर स्वच्छता करतांना स्वयंसेवक




दंतक ग्राम येथील शालेय विद्यार्थ्यांना शिबिरातील विविध प्रकल्पान बद्दलची माहिती देतांना रासेयो कार्य. अधिकारी




अपोती खुर्द येथील शाळेतील मुलांना Covid-19 लसीकरण शिबिराची माहिती देत्ताना रासेयो ची चमू. १५० पेक्षा जास्त मुलांना यशस्लावीरीत्सया देण्यात आली.




सकाळच्यावेळी प्रभात फेरी काढून गावातील लोकांमध्ये आरोग्य, पर्यावरण तसेच स्वच्छते बद्दल ची जनजागृतीचे काम करण्यात आले.







गावातील परिसर स्वच्छं करून श्रमदान केले व स्वच्छता हीच चांगल्खया आरोग्याची  खरी शिदोरी आहे हे गावकर्यांना पटवून दिले.







दोन विविध पथ नाट्याच्या सहाय्याने गावकर्यानंचे उद्बोधन काण्र्याचे काम रासेयो च्या स्वयंसेवकांनी केले. एस.टी. बस स्थानक , गावातील मंदिराचे ठिकाणी, आणि आठवडी बाजारात पथ नाट्याचे सादरीकरण केल्या गेले.




“अवकाश दर्शन” हयाचे मार्गदर्शन  प्रा.शैलेश जैस्वाल ह्यांनी शालेय विद्यार्थी व स्वयंसेवक ह्यांचे मार्गदर्शन केले.




**डॉ.अर्चना सावरकर व डॉ रश्मी  जोशी, प्राणीशास्त्र विभाग हयांनी गावातील महिलांना पर्घ**यावरण पूरक विद्यार्थ्यांनी बनवलेले पक्ष्यांचे घरटे वितरीत केले व उन्हाळ्यात पक्ष्यांना दाणे व पाणी ठेवूण्याचे आव्हान केले.








दि बेरार जनरल एज्यु. सोसायटी चे मा. अध्यक्ष **Adv.** मोतीसिंगजी मोहता व अकोला सेवाप्रधीकरण चे विविध न्यायाधीश ह्यांनी शिबिरार्थी व गावकर्यांचे कायदे विषयक मार्गदर्शन केले.



सामाजिक कार्यकर्ता डॉ. स्वप्ना लांडे गावातील लोकांना जादूटोणा प्रतिबंधक कायद्याविषयी सांगतांना




मा.डॉ. उदय वझे पक्ष्यांच्या जैवविविधता बद्दल मार्गदर्शन करतांना







दत्तक गाव सुलतानपूर येथे उन्नत भारत अभियान अंतर्गत पारिवारिक सर्वेक्षण करतांना दर. रश्मी जोशी व विद्यार्थी







उन्नत भारत अभियान पारिवारिक सर्वेक्षण













दत्तक गावात विविध ४ ठिकाणी शिबिराच्या ६ दिवसांमध्ये ४ शोष खड्डे तयार करण्यात आले. खड्डे खंतांना व त्यामध्ये गिट्टी व मुरूम भरतांना स्वयंसेवक व रासेयो कार्यक्रम अधिकारी







**डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे व रासेयो ची चमू श्रमदान करतांना.**













**सह कार्य.अधि. प्रा. शैलेश जयस्वाल , डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे व संपूर्ण रासेयो ची चमू**



















श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे वूमन सेल, क्रिस्टल क्लब व रासेयो च्या संयुक्त विद्यमाने दत्तक गावातील महिलांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन. resourse person म्हणून मा.डॉ. पूनम अग्रवाल , रसायनशास्त्र विभाग प्रमुख ह्या होत्या व त्यांनी महिलांना हर्बल उत्पादने बनविण्याचे प्रशिक्षण दिले. त्या वेळी वूमन सेल च्या अध्यक्ष डॉ. सुजाता ताडम, डॉ. कविता हेडा, डॉ. अंजली सांगोले, डॉ. अर्चना सावरकर, प्रा. वैशाली बडगुजर आणि प्रा. सोनाली गवांदे ह्या उपस्थित होत्या. डॉ. रश्मी जोशी ह्यांनी कार्यशाळेच्या यशस्वितेकरिता अथक परिश्रम केले.






उन्नत भारत अभियान सर्वेक्षण













शिबिराच्या शेवटच्या दिवशी दुपारच्या सत्रात समारोप कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ वी.डी. नानोटी व प्रमुख पाहुणे म्हणून दि बी.जी.ई. सोसायटीचे उपसचिव मा.अभिजितजी परांजपे, क.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष मा.कडू गुरुजी हे मान्यवर उपस्थित होते. शिबिराचे अहवाल वाचन डॉ. रश्मी जोशी ह्यांनी केले तर संचालन डॉ. समाधान मुंडे ह्यांनी केले.

लोकमत समाचार

## एक नजर

# श्रम संस्कार शिविर में पहुंचे रासेयो संचालक



**अकोला** : स्थानीय आरएलटी विज्ञान महाविद्यालय की ओर से गोद लिए ग्राम आपोती खुर्द में 8 दिवसीय श्रमसंस्कार शिविर का आयोजन 19 से 26 मार्च के बीच किया गया था. इस शिविर के तीसरे दिन अमरावती विश्वविद्यालय के रासेयो संचालक डॉ.राजेश बुरंगे ने भेंट दी. उनकेसाथ पर्यावरण पुरस्कार विजेता अरुण शेवाने उपस्थित थे.बुरंगे ने श्रमसंस्कार का महत्व बताया. वर्तमान समय में राष्ट्रीय सेवा योजना यह एक सशक्त माध्यम है. इस माध्यम से युवाओं में समाजसेवा के प्रति रुझान बढ़ाया जा सकता है.साथ ही राष्ट्रीय सेवा योजना के विभिन्न कार्यों के बारे में जानकारी दी. इस मौके पर पक्षियों के घोसले ग्राम पंचायत, शिविर शाला के मैदान तथा आरलटी महाविद्यालय समेत जिले के विभिन्न श्रमसंस्कार शिविर को प्रदान किए गए. इस अवसर पर आपातापा के उपसरपंच, ग्रामसेवक, महाविद्यालय के सुक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हरीश मालपाणी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मि जोशी सावलकर, डॉ.समाधान मुंडे, प्रा.शैलेश जयस्वाल तथा प्रा. सोनाली गवांदे आदि उपस्थित थीं

# श्री रलातो.विज्ञान महाविद्यालय के श्रमसंस्कार शिविर को रासेयो के संचालक ने दी भेट



**अकोला**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संचालित दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी के श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय का आठ दिवसीय श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम आपोती खुर्द मे संपन्न हुवा.दि १९ मार्च सें २६ मार्च तक आयोजित इस शिबिर के तिसरे दिन के बौद्धिक सत्र मे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ के रासेयो के संचालक, डॉ. राजेश बुरंगे ने सदिच्छा भेट दी. उनके साथ संत गाडगे बाबा पर्यावरण पुरस्कार के विजेता, पक्षी मित्र अरुण शेवाने उपस्थित थे.बुरंगे ने अपने मार्गदर्शन में श्रमसंस्कार की महत्ता को प्रतिपादित किया.आज की पिढी निर्माण हेतू राष्ट्रीय सेवा योजना यह एक सशक्त एकमात्र माध्यम हैं.इस माध्यम सें युवको मे समाजसेवा का बीज बोने की सेवा राष्ट्रीय सेवा योजना के माध्यम सें की जा रही हैं ऐसी जानकारी दी गयी. उन्होंने दि बेरार जनरल एज्युकेशन सोसा.के अध्यक्ष एड मोतीसिंह मोहता एवं सभी पदाधिकारियो के सहयोग हेतू उनका आभार माना. डॉ. बुरंगे के जन्मदिन का औचित्य साधकर उन्होने पंछियो के लिये बनाये घर ग्रामपंचायत,शिबिर शाला के प्रांगण मे,श्री रा.ल.तो. महाविद्यालयास एवं जिले के विविध श्रमसंस्कार शिबिर को प्रदान किये.

नवभारत

# श्रमसंस्कार का बताया महत्व

## शिविर को रासेयो के संचालक ने दी भेंट



■ **अकोला,** ब्यूरो. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संचालित दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी के राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय (आरएलटी) का आठ दिवसीय श्रमसंस्कार शिविर दत्तक ग्राम आपोती खुर्द में संपन्न हुआ. 19 मार्च से 26 मार्च तक आयोजित इस शिविर के तीसरे दिन के बौद्धिक सत्र में संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ के रासेयो के संचालक डा. राजेश बुरंगे ने भेंट दी. उनके साथ संत गाडगे बाबा पर्यावरण पुरस्कार के विजेता, पक्षी मित्र अरुण शेवाने उपस्थित थे.

बुरंगे ने अपने मार्गदर्शन में श्रमसंस्कार की महत्ता को प्रतिपादित किया. आज की पीढ़ी निर्माण हेतु राष्ट्रीय सेवा योजना यह एक सशक्त एकमात्र माध्यम हैं. इस माध्यम से युवकों में समाजसेवा का बीज बोने की सेवा राष्ट्रीय सेवा योजना के माध्यम से की जा रही हैं. ऐसी जानकारी दी गई. उन्होंने दि बेरार जनरल एज्युकेशन सोसा. के अध्यक्ष एड. मोतीसिंह मोहता एवं सभी पदाधिकारियों के सहयोग हेतु उनका आभार माना. डा. बुरंगे के जन्मदिन का औचित्य साधकर उन्होंने पंछियो के लिए बनाए घर ग्राम पंचायत, शिविर शाला के प्रांगण में आरएलटी महाविद्यालयास एवं जिले के विविध श्रमसंस्कार शिविर को प्रदान किए. इस समय आपातापा के उप सरपंच, ग्रामसेवक, महाविद्यालय के सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डा. हरीश मालपाणी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डा. रश्मी जोशी सावलकर, डा. समाधान मुंडे समेत कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल एवं प्रा. सोनाली गवांदे आदि उपस्थित थे.

Akola Edition
31-mar-2022 Page No. 4
epaper.enavabharat.com

# श्री रलातो.विज्ञान महाविद्यालय के श्रमसंस्कार शिबिर को रासेयो के संचालक ने दी भेट



अकोला-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संचालित दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी के श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय का आठ दिवसीय श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम आपोती खुर्द मे संपन्न हुवा.दि १९ मार्च सें २६ मार्च तक आयोजित इस शिबिर के तिसरे दिन के बौद्धिक सत्र मे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ के रासेयो के संचालक,डॉ. राजेश बुरंगे ने सदिच्छा भेट दी.उनके साथ संत गाडगे बाबा पर्यावरण पुरस्कार के विजेता,पक्षी मित्र अरुण शेवाने उपस्थित थे.बुरंगे ने अपने मार्गदर्शन में श्रमसंस्कार की महत्ता को प्रतिपादित किया.आज की पिढी निर्माण हेतू राष्ट्रीय सेवा योजना यह एक सशक्त एकमात्र माध्यम हैं.इस माध्यम सें युवको मे समाजसेवा का बीज बोने की सेवा राष्ट्रीय सेवा योजना के माध्यम सें की जा रही हैं ऐसी जानकारी दी गयी. उन्होंने दि बेरार जनरल एज्युकेशन सोसा.के अध्यक्ष एड मोतीसिंह मोहता एवं सभी पदाधिकारियो के सहयोग हेतू उनका आभार माना. डॉ. बुरंगे के जन्मदिन का औचित्य साधकर उन्होने पंछियो के लिये बनाये घर ग्रामपंचायत,शिबिर शाला के प्रांगण मे, श्री रा.ल. तो. महाविद्यालयास एवं जिले के विविध श्रमसंस्कार शिबिर को प्रदान किये.इस समय आपातापा के उपसरपंच, ग्रामसेवक,महाविद्यालय के सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हरीश मालपाणी,रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर,डॉ.समाधान मुंडे समेत कार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेश जयस्वाल एवं प्रा. सोनाली गवादे आदी उपस्थित थे.

# श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराला रासेयोच्या संचालकांची भेट

**■ प्रतिनिधी । अकोला ■**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संचालित दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीच्या राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालयाचे आठ दिवसीय श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम आपोती खुर्द येथे संपन्न झाले.दि १९ मार्च ते २६ मार्च पर्यंत आयोजित या शिबिराच्या तिसऱ्या दिवशीच्या बौद्धिक सत्रात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे रासेयोचे संचालक, डॉ. राजेश बुरंगे यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या सोबत संत गाडगे बाबा पर्यावरण पुरस्कारचे मानकरी, पक्षी मित्र अरुण शेवाने



उपस्थित होते.बुरंगे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात श्रमसंस्काराची जाण आजच्या पिढीला घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एकमात्र माध्यम आहे. समाजसेवेचे बी रुजविण्याचे महान कार्य आजच्या या युवकांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केले जात आहे. त्यांनी दि बेरार जनरल एज्युकेशन सोसा.चे अध्यक्ष एड मोतीसिंह मोहता व सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.डॉ. बुरंगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांनी पक्ष्यांसाठी बनविलेले घरटे ग्रामपंचायत, शिबिराच्या शाळेतील प्रांगणात, श्री रा.ल. तो. महाविद्यालयास व जिल्ह्यातील विविध श्रमसंस्कार शिबिराला त्यांनी भेट दिली.यावेळी आपातापाचे उपसरपंच,ग्रामसेवक, महाविद्यालयाचे सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हरीश मालपाणी,रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर,डॉ.समाधान मुंडे, सह कार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेश जयस्वाल व प्रा. सोनाली गवांदे आदी उपस्थित होते.

जाहिर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क स्तर) बाळापूर यांचे न्यायालयात

# आरएलटी विज्ञान महाविद्यालयाचे रासेयोचे विशेष शिबीर ग्राम आपोती येथे संपन्न

प्रतिनिधी ३ एप्रिल

**अकोला** : स्थानिक श्री आरएलटी विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष शिबीर नुकतेच १९ मार्च ते २६ मार्च या दरम्यान दत्तक ग्राम आपोती खुर्द येथे संपन्न झाले. या शिबीराचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी यांचे मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे, डॉ.रश्मी जोशी सावलकर सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेष




जयस्वाल, प्रा.सौ.सोनाली गवांदे यांच्या नेतृत्वात गट प्रमुख-विद्यार्थी प्रतिनिधी शंतनू वावगे, ऋतुजा दांदळे यांच्या सहकार्याने संपन्न झाले. या शिबीरात १०० शिबीरार्थ्यांनी सहभाग घेतला.

विशेष शिबीराचे उद्घाटन सोहळा दिनांक २०.३.२२ रोजी सौ.करूणाताई शांताराम बुटे यांच्या हस्ते व क.शि.प्र. संस्थेच्या प्राचार्या सुचिता बुजूर्गे, उपसरपंच सौ.रेखाताई घोडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. दिनांक २१ मार्च रोजी कोविड-१९ लसीकरण शिबीराचे आयोजन करण्यात आले. याचा लाभ गावातील १७५ ग्रामस्थांनी घेतला. हे शिबीर डॉ.अस्मिता पाठक व डॉ.मनिष शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या शिबीरात दररोज सकाळच्या सत्रामध्ये श्रमदान घेण्यात आले. या मध्ये शिबीरार्थीनी ०५ शोषखडड्यांची निर्मिती केली. दुपारच्या बौध्दिक सत्रामध्ये डॉ.हरीश मालपाणी पर्यावरण संवर्धनात ➤ पान २ वर

## आरएलटी विज्ञान ...

सुक्ष्मजीवांचा वाटा, उदय वझे जैव विविधतेचा परिचय, जीवन देशमुख यांनी ताण-तणाव मुक्त शैली. रासेयो क्षेत्रिय समन्वयक डॉ.सुधिर कोहचाळे, प्रा.शैलेन्द्र मडावी, प्रा. शंकेश झायटे यांनी आपत्ती व्यवस्थापन. तसेच दि बीजीई संस्थेचे अध्यक्ष ॲड.मोतीसिंह मोहता यांचे मार्गदर्शनाखाली कायदे-विषयक मार्गदर्शन शिबीर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. या कार्यक्रमात दिवाणी न्यायाधिश बोस तसेच व्ही.डी.गिते, जी.डी.वन्तरम यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा.डॉ.सुधिर कोहचाळे यांनी आयुष्याची टाळेबंदी या विषयावर , महिला मेळाव्या अंतर्गत कौशल्य विकास कार्यशाळा प्रा.डॉ.पूनम अग्रवाल, डॉ.सुजाता ताडम, डॉ.कविता हेडा, डॉ.अंजली सांगोळे, डॉ.रश्मी जोशी सावलकर, ज्योती गिते यांच्या नेतृत्वात घेण्यात आले. या कार्यशाळेत हर्बल उत्पादन या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. रक्तगट तपासणी शिबीरात ग्रामस्थांची तपासणी करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये लोक जागरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. जादू टोना प्रतिबंधक कायदा या अंतर्गत सामाजिक कार्यक्रमात डॉ.स्वप्रा लांडे यांनी मार्गदर्शन केले. अवकाश दर्शन अंतर्गत ग्रहता-यांची माहिती प्रा.शैलेष जयस्वाल यांनी दिली. प्रा.डॉ.महेश डाबरे यांनी व्यक्तिमत्व विकासा बाबत माहिती दिली.

या शिबीराचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे सहसचिव इंजि. अभिजीत परांजपे व क.शि.प्र. संस्थेचे उपाध्यक्ष दामोदरजी कडू यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. शिबीरीला डॉ.राजेशजी बुरंगे, संचालक, रासेयो, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी सदिच्छा भेट देवुन मार्गदर्शन केले. तसेच गावातील सरपंच सौ.स्वाती टोंबरे, उपसरपंच सौ.रेखाताई घोडे, पोलिस पाटील कैलास आपोतीकर, मुख्याध्यापक सतिश जाधव, माजी उपसरपंच डॉ. उमेश बोपटे, आपोती बुजुर्ग गावचे सरपंच त-हाळे, सर्व ग्राम पंचायत सदस्य यांची वेळावेळी उपस्थिती लाभली. शिबीर यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे, डॉ.रश्मी जोशी सावलकर, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेष जयस्वाल, प्रा.सोनाली गवांदे, गट प्रमुख शंतनू वावगे, कु. ऋतुजा दांदळे, भुषण गोंडचवर, राम काळमेघ, मंदार काटे, वैष्णवी महल्ले, वैष्णवी दातीर आदींनी परिश्रम घेतले.




Guests at the NSS camp.

# RLT Science College's NSS volunteers attend camp

■ **District Correspondent**
AKOLA, Apr 3

A SPECIAL camp of National Service Scheme (NSS) of local Shri RLT College of Science was held in Apoti Khurd village. Around 100 students participated in the camp.

Karuna Bute inaugurated the camp while Principal Suchita Bujurge and Deputy Sarpanch Rekha Ghode were prominent among those present.

During the camp, COVID vaccination drive was also conducted for the villagers. Total 175 villagers took advantage of the drive. Dr Asmita Pathak and Dr Manish Sharma looked after the drive.

Also, NSS volunteers dug 5 suction pits. Dr. Harish Malpani, Uday Vaze, Jeevan Deshmukh. NSS Regional Coordinator Dr. Sudhir Kohchade, Shailendra Madavi, Shankesh Zayate guided the volunteers and Adv Motisingh Mohta guided the volunteers on legal issues. Civil Judge Bose guided the students.

The programme was held under the auspices of District Legal Services Authority.

Under the guidance of Principal Dr Vijay Nanoti, NSS programme officer Dr Samadhan Munde, Dr Rashmi Joshi Sawalkarm, Shailesh Jaiswal, Sonai Gawande organised the camp.

# आरएलटी विज्ञान महाविद्यालयाचे रासेयोचे विशेष शिबीर

■ प्रतिनिधी । अकोला ■

स्थानिक श्री आरएलटी विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष शिबीर नुकतेच १९ मार्च ते २६ मार्च या दरम्यान दत्तक ग्राम आपोती खुर्द येथे संपन्न झाले. या शिबीराचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी यांचे मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे, डॉ.रश्मी जोशी सावलकर सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेष जयस्वाल, प्रा.सौ.सोनाली गवांदे यांच्या नेतृत्वात गट प्रमुख-विद्यार्थी प्रतिनिधी शंतनू वावगे, ऋतुजा दांदळे यांच्या सहकार्याने संपन्न झाले. या शिबीरात १०० शिबीरार्थ्यांनी सहभाग घेतला.



विशेष शिबीराचे उद्घाटन सोहळा दिनांक २०.३.२२ रोजी सौ.करूणाताई शांताराम बुटे यांच्या हस्ते व क.शि.प्र. संस्थेच्या प्राचार्या सुचिता बुजूर्गे, उपसरपंच सौ.रेखाताई घोडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. दिनांक २१ मार्च रोजी कोविड-१९ लसीकरण शिबीराचे आयोजन करण्यात आले. याचा लाभ गावातील १७५ ग्रामस्थांनी घेतला. रक्तगट तपासणी शिबीरात ग्रामस्थांची तपासणी करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये लोक जागरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. जादू टोना प्रतिबंधक कायदा या अंतर्गत सामाजिक कार्यक्रमात डॉ.स्वप्ना लांडे यांनी मार्गदर्शन केले. अवकाश दर्शन अंतर्गत ग्रहता-यांची माहिती प्रा.शैलेष जयस्वाल यांनी दिली. प्रा.डॉ.महेश डाबरे यांनी व्यक्तिमत्व विकासा बाबत माहिती दिली. या शिबीराचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे सहसचिव इंजि. अभिजीत परांजपे व क.शि.प्र. संस्थेचे उपाध्यक्ष दामोदरजी कडू यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. शिबीरीला डॉ.राजेशजी बुरंगे, संचालक, रासेयो, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी सदिच्छा भेट देवुन मार्गदर्शन केले. तसेच गावातील सरपंच सौ.स्वाती टोंबरे, उपसरपंच सौ.रेखाताई घोडे, पोलिस पाटील कैलास आपोतीकर, मुख्याध्यापक सतिश जाधव, माजी उपसरपंच डॉ. उमेश बोपटे, आपोती बुजुर्ग गावचे सरपंच त-हाळे, सर्व ग्राम पंचायत सदस्य यांची वेळावेळी उपस्थिती लाभली. शिबीर यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे, डॉ.रश्मी जोशी सावलकर, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेष जयस्वाल, प्रा.सोनाली गवांदे, गट प्रमुख शंतनू वावगे, कु. ऋतुजा दांदळे, भुषण गोंडचवर, राम काळमेघ, मंदार काटे, वैष्णवी महल्ले, वैष्णवी दातीर आदींनी परिश्रम घेतले.

दैनिक जनमाध्यम 2 एप्रिल 2022

# श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराला रासेयोच्या संचालकांची भेट

**प्रतिनिधी,** २ एप्रिल

**अकोला -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संचालित दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीच्या राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालयाचे आठ दिवसीय श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम आपोती खुर्द येथे संपन्न झाले.दि १९ मार्च ते २६ मार्च पर्यंत आयोजित या शिबिराच्या तिसऱ्या दिवशीच्या बौद्धिक सत्रात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे रासेयोचे संचालक,डॉ. राजेश बुरंगे यांनी सदिच्छा भेट दिली.त्यांच्या सोबत संत गाडगे बाबा पर्यावरण पुरस्काराचे मानकरी,पक्षी मित्र अरुण शेवाने उपस्थित होते.बुरंगे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात श्रमसंस्काराची जाण आजच्या पिढीला पढविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एकमात्र माध्यम आहे.समाजसेवेचे बी रुजविण्याचे महान कार्य आजच्या या युवकांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केले जात आहे. त्यांनी दि बेरार जनरल एज्युकेशन सोसा.चे अध्यक्ष एड मोतीसिंह मोहता व सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.डॉ. बुरंगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांनी पक्ष्यांसाठी बनविलेले घरटे ग्रामपंचायत, शिबिराच्या शाळेतील प्रांगणात, श्री रा.ल.तो. महाविद्यालयात व जिल्ह्यातील विविध श्रमसंस्कार शिबिराला त्यांनी भेट दिली. यावेळी आपातापाचे उपसरपंच, ग्रामसेवक, महाविद्यालयाचे सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हरीश मालपाणी,रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर, डॉ.समाधान मुंडे, सह कार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेश जयस्वाल व प्रा. सोनाली गवांदे आदी उपस्थित होते.

**Hindustan 3/4/22**